अधिसूचना

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालये,
पुणे:४११ ००१. दि.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.

जा.क्र. वियो-आष्टा/आ.क्र.४/३५-८८/टीपीव्ही-१/३३३० दि० १०।५।१९९१

ज्याअर्थी, आष्टा शहराची सुधारित विकास योजना [ यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली ] शासनाने नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-२०८०/८४४[बी]/युडी-७ दिनांक ३० जून ८२ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १ ऑक्टोबर १९८२ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या प्रस्तावानुसार नगर भूमापन क्रमांक १५६४-अ, १५६४-ब, १५६४-क आणि १५६५ [ एकूण क्षेत्र २८२१.८ चौ.मी.] या जमिनी बगीचा [आ.क्र.४] करिता आरक्षित आहेत [ यापुढे "उक्त जमिन म्हणून उल्लेखिलेली आरक्षण " असे संबोधिलेल्या ] व आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी आष्टा नगरपरिषद ही समुचित प्राधिकरण म्हणून निर्देशित केलेली आहे.
आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदेश क्र.वियो/आष्टा[सु]/आ.क्र.४/३५-८८/टीपीव्ही-२/२१३०, दि.१०.४.९० अन्वये प्रस्तुत आरक्षणातील न.भू.क्र.१५६४ क ही जागा उक्त आरक्षणातून मुक्त केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना, अधिनियम १९६६ [ महाराष्ट्र ३७ वा] [ यापुढे " उक्त अधिनियम " म्हणून उल्लेखिलेला ] च्या कलम ५० च्या उपलकलम [२] मध्ये दिलेली वैधानिक पध्दती अनुसरुन उक्त समुचित प्राधिकरणाने आ.क्र.४ "बगीचा" या आरक्षणाखालील न.भू.क्र.१५६४-अ, १५६४-ब, व १५६५ चे क्षेत्र आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव [ यापुढे " उक्त प्रस्ताव" म्हणून उल्लेखिलेला] संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक २७.१२.९० रोजी मंजूरीसाठी सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभाग निर्णय क्र.टीपीव्ही-१०८६/३७९१/सीआर-१/८७/युडी-१७, दि.५.१.१९८७ अन्वये "ब" आणि "क" वर्ग नगरपरिषदांकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ५०[२] खालील किरकोळ फेरबदलास मान्यता देण्याचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत;

आणि ज्याअर्थी, आष्टा नगरपरिषद ही "क" वर्ग नगरपरिषद आहे.

आणि ज्याअर्थी, योग्य ती चौकशी केल्यानंतर उक्त किरकोळ फेरफाराचा प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक आहे अशी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची खातरजमा झालेली आहे;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम ५० चे उपकलम[२] नुसार प्रदत्त केलेल्या शक्तीचा वापर करुन विकास योजनेतील उक्त प्रस्तावास संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे मंजूरी देत आहेत. त्या करिता नगर विकास व आरोग्य विभागाच्या निर्णय क्र.टीपीएस-३०८०/८४४[बी]/युडी-७, दि. ३० जून ८२ च्या अधिसूचनेत पुढे दिल्याप्रमाणे नविन दुरुस्ती करण्यात येत आहे;

उक्त विकास योजनेत अंतिम मंजूरी देण्याबाबतच्या अधिसूचने सोबतच्या फेरफाराच्या अनुसूचिमध्ये शेवटच्या नोंदी नंतर खाली दिलेली नवीन नोंद समाविष्ट करण्यात यावी;

" आ.क्र.४ "बगीचा" या आरक्षणाखालील न.भू.क्र.१५६४-अ, १५६४-ब व १५६५ चे क्षेत्र, सोबतच्या नकाशावर हिरव्या रंगाने दर्शविल्याप्रमाणे आरक्षणातून वगळण्यात येत आहे व असे वगळलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. "

टीप :- वरील बदल दर्शविणारा भाग नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये आष्टा नगरपरिषद.आष्टा [जि.सांगली] यांच्या कार्यालयात ठेवण्यात आला आहे.

[signature]

[ गुणवंत मदामे ]
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

NOTIFICATION

Town Planning and Valuation Department,
Central Offices, Pune-411 001.

Maharashtra Regional and Town Planning Act,1966

No.DP-Ashta/Site No.4/35-88/TPV-I/3334 dt 10/5/1991

Whereas, in the revised Development Plan of Ashta Town (hereinafter referred to as ' the said Development Plan') sanctioned by Government vide Urban Development and Public Health Department, Resolution No.2080/844(B)/UD-7, dated 30th June 1982 which has came into force with effect from 1st October, 1982 the lands bearing C.T.S.No.1564-A, 1564-B, 1564-C and 1565 (admeasuring about 2821.8 sq.mt.) have been reserved for Garden vide reservation No.4 (hereinafter referred to as ' the said reservation) and Ashta Municipal Council is designated as the Appropriate Authority for implementation of this proposal , and whereas the Director of Town Planning, Maharashtra State, Pune under his order no.DP-Ashta(R)/Site No.4/35-88/TPV-II/2130,dated 10.4.90 deleted C.T.S.No.1564 C from Site No.4 ;

And whereas, the Ashta Municipal Council (hereinafter referred to as ' the said Appropriate Authority') has conveyed that the said land bearing C.T.S.No.1564-A, 1564-B and 1565 is no longer required for the said purpose and have requested the Director of Town Planning, Maharashtra State, Pune to delete from the reservation and include the same in the Residential Zone under the provisions of Section 50 of the Maharashtra Regional and Town Planning Act,1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) and has submitted a proposal on 27.12.90 accordingly (hereinafter-referred to as ' the said proposal') ;

And whereas, Ashta is a 'C' class Municipal Council and the Government in Urban Development Department vide Resolution No.TPV-1086/3791/CR-I/87/UD-17, dated 5th January, 1987 have delegated to the Director of Town Planning,Maharashtra State, Pune the powers exercisable by it under Section 50 (2) of the said Act in respect of 'B' and 'C' class Municipal Councils ;

..2/-

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune after making inquiry as deemed necessary is satisfied that the said proposal of deletion is necessary and it should be sanctioned ;

Now, therefore, in exercise of the powers conferred on Government under Sub-Section (2) of Section 50 of the said Act, and delegated to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune sanctions the said proposals of deletion of land and for that purpose amends the Urban Development and Public Health Department Notification No. TPS-2080/844(B)/UD-7, dated 30th June 1982 as follows viz.-

In the Schedule of Modifications appended to the said Modification sanctioning the said Development Plan after the last entry the following new entry shall be added viz. -

" The land bearing C.T.S.No.1564-A, 1564-B, and 1565 under Site No.4 reserved for 'Garden' is deleted and it shall be included in Residential Zone as shown in Green on the part plan ".

NOTE : The part plan showing the minor modification as sanctioned is kept open for inspection by the public during office hours on all working days in the office of the Ashta Municipal Council, Ashta, (District-Sangli.).

( G. L. Madame )
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

vd/..

PART PLAN OF DEVELOPMENT PLAN OF ASHTA
SHOWING THE SITE NO.4 GARDEN AND ITS
SURROUNDING AREA




SCALE : 1:2400

TOWN PLANNING & VALUATION DEPARTMENT
DIRECTOR OF TOWN PLANNING
GOVT. OF MAHARASHTRA
PUNE

NOTES :

| | |
|---|---|
| (yellow) | Residential |
| (grey) | Agricultural |
| (pink) | Public & Semi-public |
| (green) | Open Space & Garden |
| (brown) | Public Utility |
| (red line) | Development Plan Road |
| (red outline) | Minor Modification U/s 37 sanctioned by D.T.P.,M.S., Pune. |
| (green outline) | Deletion u/s.50 sanctioned by the Dir.of Town Plg., M.S.Pune. |

SANCTIONED UNDER DIRECTOR OF TOWN PLANNING MAHARASHTRA STATE, PUNE'S NOTIFICATION NO. DP-Ashta/Site No.4/35.88/TPV II/3334
DATE.......... 10-5-1991 ..........
SUBJECT TO MODIFICATIONS MENTIONED IN THE SHEDULE OF MODIFICATION.

Sd/-
DIRECTOR OF TOWN PLANNING
MAHARASHTRA STATE, PUNE.